**वन्यप्राण्यांचे हल्ल्यामुळे मनुष्य मृत्यू, अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी झाल्यास द्यावयाचे अर्थसहाय्य मध्ये वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-०७१८/प्र.क्र.२६७/फ-१**
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक:- ०३ ऑगस्ट, २०२३

**वाचा :-**

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी-१००२/प्रक्र. २५८/फ-१, दिनांक २०/०५/२००३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-१०.०८/प्रक्र.२७०/फ-१, दिनांक ०२/०७/२०१०.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र क्र. डब्ल्युएलपी-२०१२/प्रक्र. ३३७/फ-१, दिनांक ३०/०३/२०१३.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी-२०१२/प्रक्र. ३३७/फ-१, दिनांक १६/०१/२०१५.
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी-०७१८/प्रक्र. २६७/फ-१, दिनांक ११/०७/२०१८.
६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी-०७१८/प्रक्र. २६७/फ-१, दिनांक २८/११/२०१८.
७) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्यूएलपी-०७१८/प्र.क्र.२६७/फ-१, दिनांक २६/०८/२०१९.
८) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी-०७१८/प्रक्र. २६७/फ-१, दिनांक २३/०८/२०२२.

**प्रस्तावना :-**

वाघ, बिबटया, अस्वल, गवा (वायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, रानकुत्रे (ढोल), रोही (निलगाय) व माकड / वानर यांच्या हल्ल्यात मनुष्य हानी झाल्यास मृत्यू, कायम अपंगत्व, गंभीर जखमी, किरकोळ जखमी या वर्गवारीनुसार अर्थसहाय्य संबंधितांना अदा करण्यात येते. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात अनेक वेळा मनुष्य मृत्यू होत नाही, परंतु गंभीर किंवा किरकोळ जखमी होतात. जखमी व्यक्तिला योग्य व तातडीचे उपचार मिळावेत व ते प्राथमिकतेने शासकीय रुग्णालयात मिळावेत याबाबत प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतात व मानवी जीव वाचविण्यात येतो. काही वेळा उपयुक्त संसाधन युक्त शासकीय रुग्णालय जवळ उपलब्ध नसते व अशा प्रसंगी जखमी व्यक्तिला खाजगी रुग्णालयात जाऊन तातडीचा उपचार करावा लागतो.

सध्याच्या आर्थिक तरतूदित मृत्यू, कायमस्वरुपी अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी व्यक्तिला द्यावयाची आर्थिक मदत त्या मानाने कमी असल्याबाबत व त्यामध्ये वाढ करण्याची बाव शासनाच्या विचाराधीन होती. जनप्रतिनिधींकडून आर्थिक सहाय्यामध्ये वाढ करण्याबाबत होणाऱ्या मागणीस अनुसरुन वन्यप्राणी हल्ल्यामुळे मनुष्य मृत्यू, कायमस्वरुपी अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी प्रकरणी देण्यात येणा-या अर्थसहाय्य रक्कम / खर्च वाढ करण्याबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

वाघ, बिबटया, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, रानकुत्रे (ढोल), रोही (निलगाय) व माकड / वानर यांच्या हल्ल्यामुळे मृत्यू / कायमस्वरुपी अपंगत्व / मनुष्य गंभीर जखमी / किरकोळ जखमी झाल्यास खालीलप्रमाणे अर्थसहाय्य / खर्च प्रतिपूर्ती देण्यात यावी.

| अक्र | तपशिल | देय असलेल्या अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | व्यक्ती मृत्यू पावल्यास | रुपये २५,००,०००/- (रु. पंचवीस लक्ष फक्त) |
| २ | व्यक्तीला कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास | रुपये ७,५०,०००/- (रु. सात लक्ष पन्नास हजार फक्त) |
| ३ | व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास | रुपये ५,००,०००/- (रु. पाच लक्ष फक्त) |
| ४ | व्यक्ती किरकोळ जखमी झाल्यास | औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात यावा. मात्र खाजगी रुग्णालयात औषधोपचार करणे आगत्याचे असल्यास त्याची मर्यादा रुपये ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) प्रति व्यक्ती अशी राहील. शक्यतो औषधोपचार शासकीय/जिल्हा परिषद रुग्णालयात करावा. |

२. वरीलप्रमाणे देण्यात येणारे अर्थसहाय्य हे शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी-१००२/प्रक्र. २५८/फ-१, दिनांक २०/०५/२००३, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-१००८/प्र.क्र.२७०/ फ-१, दिनांक ०२/०७/२०१०, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी-२०१२/ प्र.क्र.३३७/ फ-१, दिनांक ३०/०३/२०१३, शासन निर्णय, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी- २०१२/ प्र.क्र.३३७/ फ-१, दिनांक १६/०१/२०१५, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी- ०७१८/ प्र.क्र.२६७/ फ-१, दिनांक ११/०७/२०१८, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी- ०७१८/ प्र.क्र.२६७/ फ-१, दिनांक २८/११/२०१८, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी- ०७१८/ प्र.क्र.२६७/ फ-१, दिनांक २६/०८/२०१९, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.डब्ल्यूएलपी- ०७१८/ प्र.क्र.२६७/ फ-१, दिनांक २३/०८/२०२२ ई. शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधिन राहील.

३. वन्यप्राणी हल्ल्यामुळे मृत व्यक्तीच्या वारसांना देण्यात येणा-या रक्कमेपैकी रु. १०.०० लक्ष (रु. दहा लक्ष फक्त) देय असलेल्या व्यक्तीला तात्काळ धनादेशाद्वारे व उर्वरित रक्कम रु. १०.०० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त) ५ वर्षांकरिता फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवावे आणि उर्वरित ५.०० लक्ष (रुपये पाच लक्ष फक्त) १० वर्षांकरिता फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवावे. दहा वर्षांनंतर वारसांना पूर्ण रक्कम मिळेल.

४. सदर बाबीचा खर्च वन्यप्राण्यांमुळे झालेल्या हानीसाठी नुकसान भरपाई (अनिवार्य), २४०६ - २३६६ या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येईल.

५. उपरोक्त तरतुदी शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.